रे.दि.दा.नं.२८८/१०
(CNR No.MHOS09-001311-2010)
बब्रुवान वि. अर्जुन

## आदेश निशाणी ७२ खाली

१. वादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेण्यात येवुन त्याचे वारसांना दाव्यात वादी क्र. १/अ ते १/क सदरात समाविष्ठ करण्यात यावे म्हणुन सदरचा अर्ज वादीतर्फे देण्यात आलेला आहे. सदर अर्जावर प्रतिवादी क्र. ४, ७ व ८ तर्फे वकीलांनी दिलेले म्हणणे वाचले. इतर प्रतिवादींनी त्यांना संधी देवुनही त्यांचे म्हणणे दिले नाही.

२. वादीतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला आहे की, वादी क्र. १ हे दिनांक २०.०४.२०१७ रोजी मयत झाले असुन त्याचे वारसांना दाव्यात वादी क्र. १/अ ते १/क सदरात समाविष्ठ करणे गरजेचे आहे. त्यामुळे अर्ज मंजुर करण्यात यावा. प्रतिवादी क्र. ४, ७ व ८ तर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला आहे की, अर्जातील नमुद कारण कायदेशिर व योग्य नसल्यामुळे तो नामंजुर करण्यात यावा.

३. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने सदरचे प्रकरण मालकी घोषीत करून निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केले आहे. प्रकरण स्थावर मिळकतीबाबत असुन वादी व प्रतिवादींचे कायदेशिर हक्क त्यामध्ये गुंतलेले आहेत. अर्जातील नमुद कारण पाहता, सदरचा अर्ज न्यायहेतू मंजुर करून वादी क्र. १ चे वारस दाव्यात वादी क्र. १/अ ते १/क म्हणुन रेकॉर्डवर घेणे योग्य होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

### आ दे श

१. प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

दिनांक : ०५.०३.२०१८

**( प्रि.म. पाटील )**
सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, कळंब.